वाचले:-

१ श्री. चंडालीया राकेश विनोद, सफाई सेवक यांचा दिनांक १६/०९/२०२६ रोजीचा स्वेछा सेवानिवृत्ति मिळणेबाबतचा अर्ज.

२ क्षेत्रीय अधिकारी, ह क्षेत्रीय आरोग्य यांचेकडील पत्र क्रमांक हक्षेका/आरो/०३/कावि/८२२/२०२६ दिनांक २८/१०/२०२६

३ मा.अधिष्ठाता, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाकडील पत्र क्र.YCMH/१२/WS/१०४७/२०२६, दि.१६/१०/२०२६

४ महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तिवेतन नियम १९८२ मधील नियम ६६

५ अधिकार प्रदान आदेश क्रमांक साप्रवि/०२/कावि/४५८/२०२५ दिनांक ०३/१०/२०२६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि/०५/कावि/३६३/२०२६
दिनांक : ०५/१९/२०२६

विषय:- श्री. चंडालीया राकेश विनोद, सफाई सेवक
(संगणक क्रमांक ९१५७) यांना वैद्यकीय कारणास्तव स्वेच्छा सेवानिवृत्ति मंजूर करणेबाबत.....

आदेश,

श्री. चंडालीया राकेश विनोद हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील 'सफाई सेवक' या गट ड मधील पदावर ह क्षेत्रीय आरोग्य विभाग अंतर्गत ह क्षेत्रीय आरोग्य ३ येथे कार्यरत आहेत. त्यांनी दिनांक १६/०९/२०२६ रोजीच्या अर्जान्वये वैद्यकीय कारणास्तव स्वेच्छानिवृत्ति मिळणेबाबत विनंती केली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ नुसार कर्मचा-याची २० वर्ष इतकी अर्हताकारी सेवा पूर्ण झाल्यानंतर नियुक्ती प्राधिका-यांस ३ महिन्याची लेखी नोटीस देवून सेवेतून केंव्हाही सेवानिवृत्त होता येईल अशी तरतूद आहे. आदेश क्रमांक प्रशा/२/कावि/५४६/२०१६, दिनांक ०७/१०/२०१६ अन्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचा-याने स्वेच्छा निवृत्तीबाबत लेखी नोटीस (तीन महिने अगोदर) देऊन स्वतःहून सेवानिवृत्त मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे अशा अधिकारी / कर्मचा-यास त्याने दिलेल्या तीन महिन्यांच्या लेखी नोटीशीची तीन महिन्यांची मुदत संपल्यानंतरच्या लगतच्या दिनांकास मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून सेवानिवृत्त करण्यात यावे, असे आदेश पारित करण्यात आले आहेत.

श्री.चंडालीया राकेश विनोद, यांनी वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्त करावे अशी विनंती केली आहे. त्याअनुषंगाने क्र.YCMH/१२/WS/१०४७/२०२६, दि.१६/१०/२०२६ रोजीचे मा.अधिष्ठाता यांचे कडील वैद्यकीय प्रमाणपत्रा नुसार "PIVD (PROLAPSED INTERVERTEBRAL DISC) L5S1]". या आजारामुळे ते काम करण्यास अपात्र असल्याबाबत दाखला आहे.

श्री.चंडालीया राकेश विनोद, यांच्या सेवानोंद पुस्तकामधील नोंदी नुसार त्यांची जन्मतारिख १९/०८/१९८६ अशी असून दिनांक २७/०१/२००६ रोजी ते मनपा आस्थापनेवरील 'सफाई सेवक' पदावर रूजू झाले आहेत. दिनांक १६/१०/२०२६ पर्यंत त्यांची मनपामधील एकूण सेवा २० वर्ष ८ महिने २० दिवस इतकी पूर्ण होत आहे.

क्षेत्रीय अधिकारी, ह क्षेत्रीय आरोग्य विभाग यांनी उपरोक्त वाचले क्र.२ रोजीचे पत्रान्वये श्री. चंडालीया राकेश विनोद, सफाई सेवक, यांचे कडून मनपाचे घर बांधणी कर्ज व घर दुरुस्ती कर्ज, वाहन कर्ज, इत्यादी येणे बाकी दिसुन येत नाही. तसेच सद्यस्थितीत त्यांची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नाही, असा अहवाल सादर केला असून, त्यांना वैद्यकीय कारणास्तव स्वेच्छासेवानिवृत्ति मंजूर करणेस स्पष्ट शिफारस केलेली आहे.

सबब, मी उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, श्री.चंडालीया राकेश विनोद, सफाई सेवक, यांनी दिनांक १६/०९/२०२६ रोजीच्या अर्जान्वये वैद्यकीय कारणास्तव स्वेच्छासेवानिवृत्ति मिळावी म्हणून केलेली विनंती क्षेत्रीय अधिकारी, ह क्षेत्रीय आरोग्य विभाग यांचेकडील शिफारस व महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ति वेतन नियम १९८२ मधील उक्त तरतूद विचारात घेऊन श्री. चंडालीया राकेश विनोद, सफाई सेवक यांना दिनांक १६/१०/२०२६ रोजी मध्यान्हंतर महापालिका सेवेतून वैद्यकीय कारणास्तव स्वेच्छासेवानिवृत्ति देण्यास या आदेशान्वये मान्यता देत आहे.

श्री.चंडालीया राकेश विनोद, यांना निवृत्ति वेतन, सेवाउपदान इ. रकमा अदा करण्यासाठी संबंधित विभागाने आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून प्रकरण त्वरीत लेखाविभागाकडे सादर करावे. लेखाविभागाने श्री. चंडालीया राकेश विनोद, सफाई सेवक याचेकडून मनपाचे घरबांधणी कर्ज, वाहनकर्ज, संगणक कर्ज,तसेच वैद्यकीय अग्रिम इत्यादी पैकी अथवा अन्य काही रक्कम येणे बाकी आहे काय? या बाबत खातरजमा करावी श्री. चंडालीया राकेश विनोद, सफाई कामगार यांचे स्वेच्छासेवानिवृत्ति नंतर वारस नेमणुकीसाठी वारसपात्र व्यक्तीचा नोकरी अर्ज स्वेच्छासेवानिवृत्तीच्या दिनांकापासुन ०१ वर्षाच्या आत मुदतीत सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी. तथापि त्यांचे कडून काही येणे बाकी रक्कम असल्यास ती त्यांना देय असलेल्या रकमेतून वसूल करून अंतिमत: देय रक्कम त्यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तिच्या दिनांकास अदा करावी. तसेच लेखापरीक्षणार्थ येणे रक्कम निघाल्यास ती श्री. चंडालीया राकेश विनोद यांनी भरणे बंधनकारक राहील.

प्रस्तूत आदेशाची नोंद त्यांच्या सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका स्थापना ११/१०/८२ पिंपरी-४११०१८

Digital Signature
Signature valid
Name : KHOT SANDEEP DADASAHEB
Designation:Deputy Commissioner
Location:.
Date :05-11-2026 14:22

प्रती - 1) श्री. चंडालीया राकेश विनोद, सफाई सेवक ह क्षेत्रीय आरोग्य ३ विभाग

प्रत - 1) लेखा विभाग २) लेखा परीक्षण विभाग ३) सामान्य प्रशासन टेबल क्र.७,१०,१२,१४,१५ ४) सामान्य प्रशासन विभाग-संगणक कक्ष ५) दूरसंचार विभाग ६) कामगार कल्याण विभाग ७) विद्युत विभाग ८) पिंपरी चिंचवड मनपा कर्मचारी महासंघ ९) पिंपरी चिंचवड मनपा सेवकांची पतसंस्था १०) ह क्षेत्रीय आरोग्य ३ विभाग - २/- सोबत श्री. चंडालीया राकेश विनोद, सफाई सेवक यांचे मूळ सेवानोंद पुस्तक आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविणेत येत आहे.